
प्रधान मंत्री आवास योजना-शहरी
Pradhan Mantri Awas Yojana-Urban

**PMAY अंतर्गत २.५ लाख रुपयांचे अनुदान**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी उपलब्ध**

सिडको
शहरांचे शिल्पकार

# माझा 1स्ट चॉइस नवी मुंबईमध्ये

# माझे पसंतीचे सिडकोचे घर
## — योजना —



कलात्मक प्रतिमा

## माहिती पुस्तिका, डिसेंबर २०२५

https://cidcohomes.com

# सिडकोची महागृहनिर्माण योजना

सिडकोने महाराष्ट्रातील लाखो लोकांच्या घराच्या आकांक्षा पूर्ण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सिडकोने गेल्या काही वर्षांत विविध दूरदर्शी धोरणे, डिजिटल आणि तंत्रज्ञानातील प्रगती इत्यादींच्या मदतीने संबंधित सर्व भागधारकांचा सहभाग सुनिश्चित केला व प्रधानमंत्री आवास योजनेसाठी (पीएमएवाय) पुढाकार घेऊन या योजनेचा लाभ पात्र कुटुंबांपर्यंत पोहोचवला आहे.

या योजनेअंतर्गत नवी मुंबईतील विविध नोड्समध्ये दिल्या जाणाऱ्या घरांची एक खास वैशिष्ट्य म्हणजे ही घरे 'ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट' (TOD) या संकल्पनेवर आधारित विकसित केली जात आहेत. या वैशिष्ट्यांमुळे नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात सुलभता येण्यासोबतच, प्रवासाच्या वेळेची व पैशाची बचत करण्याच्या उद्देशानेच ही घरे रेल्वे स्थानके, बस स्थानके व मेट्रो स्थानकांच्या जवळ विकसित केली आहेत.

अत्याधुनिक प्रीकास्ट, हरित आणि बांधकामातील प्रगत नवतंत्रज्ञानाने बांधल्याने या घरांचा गुणवत्तेचा दर्जा देखील उत्कृष्ट आहे. याशिवाय बांधकाम जलदगतीने पूर्ण होण्यासोबतच या इमारती मजबूत व टिकाऊही आहेत. या गृहप्रकल्पाच्या बांधणीसाठी वापरलेले अन्य संबंधित घटक, सफाईदार फिनिशिंग इ.साठी देखील दर्जेदार उत्पादनांचाच वापर करून बळकट बांधकामाशी समतोल साधला आहे. सिडकोकडे असलेल्या तंत्रकुशल मनुष्यबळामुळे अनेक व्यापक उद्दिष्टांची पूर्तता करण्याची अद्वितीय क्षमता लाभली आहे.





# उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांचा शुभसंदेश

नवी मुंबईतील सिडकोच्या वेगवेगळ्या प्रवर्गातील असलेल्या घरांच्या किंमती थेट १० टक्क्यांनी स्वस्त करण्याची घोषणा महाराष्ट्र शासनातर्फे करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आता ही घरे पूर्वीपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध होणार असून नवी मुंबई परिसरात घर घेण्याचे सर्वसामान्यांचे स्वप्न आता अधिक सुकर होणार आहे. या अंतर्गत सिडकोतर्फे "माझे पसंतीचे सिडकोचे घर" ही महागृहनिर्माण योजना दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आली आहे. या योजनेमध्ये नवीन ९,२४९ घरांचा समावेश असून यापूर्वीच्या १२ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहिर करण्यात आलेल्या महागृहनिर्माण योजनेतील घरांचे पर्याय निवडलेल्या ९,८८३ अर्जदारांना त्यांचे घर पुन्हा निश्चित करण्यासाठी १० दिवसांची मुदत देण्यात येत आहे.

या गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल व कळंबोली या महत्वपूर्ण नोड्समध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटाकरिता १ आणि २ बीएचके प्रकारातील घरे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

सदर महागृहनिर्माण योजनेतील नवीन ९,२४९ घरांसाठी दिनांक १५ डिसेंबर २०२५ ते १४ जानेवारी २०२६ या कालावधीत अर्ज नोंदणी करता येणार आहे. इच्छुक नागरिकांनी अर्ज नोंदणी तसेच सविस्तर माहितीकरिता www.cidcohomes.com या संकेतस्थळास भेट द्यावी. त्याचप्रमाणे ज्या ९,८८३ अर्जदारांना पुन्हा घर निश्चित करण्याची संधी देण्यात आली आहे, त्यांच्यासाठी २० डिसेंबर २०२५ ते ९ जानेवारी २०२६ पर्यंत ठराविक मुदत देण्यात आली आहे.

सिडकोच्या घरांच्या किंमतीमध्ये १०% कपात केल्याने अल्प उत्पन्न गट आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील घरे लक्षणीयरीत्या अधिक परवडणारी ठरणार आहेत. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील घरखरेदीदारांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मिळणाऱ्या रु. २.५ लाखांच्या अनुदानासोबतच १०% स्वस्त किंमतींचा एकत्रित लाभ मिळणार असून, त्यामुळे एकूण आर्थिक भार कमी होऊन घर घेणे अधिक सुलभ होणार आहे.

नवी मुंबई एका नव्या युगाच्या स्वागतासाठी सज्ज आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून, २५ डिसेंबर २०२५ रोजी पहिल्या व्यावसायिक विमानसेवेची सुरुवात करण्यात आली आहे. आकाशाकडे झेप घेणारे हे विमान नवी मुंबईच्या महत्त्वाकांक्षेचे प्रतीक आहे. कारण सतत भविष्याकडे दृष्टी ठेवून, नवनवीन आव्हानांना सामोरे जात विकसित होत जाण्याची अंगभूत क्षमता या शहराच्या अंगी आहे. परिवहनाच्या नवनवीन प्रकल्पांमुळे शहरातील कनेक्टिव्हिटी दिवसेंदिवस अधिक सक्षम होत आहे. सिडकोने हाती घेतलेल्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे शहराचा आर्थिक विकास होण्यासह उद्योग, व्यवसाय आणि रोजगाराच्या देखील मुबलक संधी येत्या काळात निर्माण होणार आहेत.

या गृहनिर्माण योजनेद्वारे आपल्या घराचे स्वप्न साकार होण्याकरिता मी हार्दिक शुभेच्छा देतो.

**श्री. विजय सिंघल**
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको



# अनुक्रमणिका




| क्रमांक | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १ | सिडको महागृहनिर्माण योजनाः डिसेंबर २०२५ प्रकल्प तपशील | ५ |
| २ | प्रकल्पांचे महारेरा तपशील | ६ |
| ३ | नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सान्निध्यात आणि प्रकल्प सुविधा | ७ |
| ४ | सिडको महागृहनिर्माण योजना – गट | ८ |
| ५ | पात्रता निकष | ९-१० |
| ६ | सर्वसाधारण अटी | ११-१५ |
| ७ | बुकिंगची पद्धत | १६-१७ |
| ८ | ऑनलाईन नोंदणी (ई-केवायसी) प्रक्रिया | १८-२० |
| ९ | तुमच्या पसंतीचे स्थळ, टॉवर आणि मजला क्रमांक निवड | २१ |
| १० | सोडतीची प्रक्रिया आणि क्रम | २२ |
| ११ | देयक अटी व शर्ती | २३ |
| १२ | परिशिष्ट I (कागदपत्रे) | २४ |
| १३ | फॉर्म/प्रतिज्ञापत्र | २५-३५ |

# सिडको महागृहनिर्माण योजना : डिसेंबर २०२५ प्रकल्प तपशील



| अ. क्र. | स्थळ | प्रकार | रेरा चटईक्षेत्र (चौरस मीटर) | चटईक्षेत्र (चौरस फूट) | टॉवरची संख्या | युनिटची संख्या | किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खारघर पूर्व (तळोजा), सेक्टर - २८ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | २६.८६ ते २७.०९ पर्यंत | ३२२ | ११ | ९९ | ₹२२.६० लाख |
| २ | खारघर पूर्व (तळोजा), सेक्टर - ३९ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | २७.४७ ते २७.५६ पर्यंत | ३२२ | ४१ | ४५९९ | ₹२३.५० लाख |
| ३ | खारघर बस डेपो | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | २७.१० ते २७.१२ पर्यंत | ३२२ | १० | १९१ | ₹४३.५० लाख |
| ४ | खारकोपर २ए | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | २७.१८ ते २७.४७ पर्यंत | ३२२ | ३ | १७ | ₹३४.८० लाख |
| ५ | खारकोपर २बी | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | २७.१८ ते २७.४७ पर्यंत | ३२२ | ३ | १५ | ₹३४.८० लाख |
| ६ | कळंबोली बस डेपो | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | २७.१० ते २७.१२ पर्यंत | ३२२ | ८ | १५१ | ₹३७.७० लाख |
| ७ | बामणडोंगरी | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | २७.१२ ते २७.४९ पर्यंत | ३२२ | ४३ | १४४ | ₹२८.७० लाख |
| ८ | खारघर पूर्व तळोजा सेक्टर-३७ | अल्प उत्पन्न गट- ए | ३३.६९ ते ३४.८५ पर्यंत | ३९८ | ४ | ३८ | ₹३०.८० लाख |
| ९ | पनवेल (प.) बस टर्मिनस | अल्प उत्पन्न गट | २७.१० ते २७.१२ पर्यंत | ३२२ | २ | ६ | ₹४०.६० लाख |
| १० | खारघर बस टर्मिनस | अल्प उत्पन्न गट | २७.१० ते २७.१२ पर्यंत | ३२२ | २ | २ | ₹४३.५० लाख |
| ११ | मानसरोवर रेल्वे स्टेशन | अल्प उत्पन्न गट | २७.१० ते २७.१२ पर्यंत | ३२२ | ११ | २१ | ₹३७.७० लाख |
| १२ | खांदेश्वर रेल्वे स्टेशन | अल्प उत्पन्न गट | २७.१० ते २७.१६ पर्यंत | ३२२ | १७ | ४९ | ₹४२ लाख |
| १३ | खारकोपर सेक्टर-१६ए भूखंड क्र. ३ | अल्प उत्पन्न गट | २७.१८ ते २७.४८ पर्यंत | ३२२ | १९ | २७७ | ₹३६.३० लाख |
| १४ | वाशी ट्रक टर्मिनल | अल्प उत्पन्न गट | २७.१० ते २७.१२ पर्यंत | ३२२ | १५ | ५२४ | ₹६६.७० लाख |
| १५ | खारघर स्टेशन | अल्प उत्पन्न गट- बी | ४७.२३ | ५४० | १७ | ७४ | ₹८७.५० लाख |
| १६ | खारकोपर पी३ विस्तार | अल्प उत्पन्न गट | २७.१२ ते २७.४९ पर्यंत | ३२२ | ७ | ७२३ | *किंमती लवकरच जाहीर केल्या जातील |
| | | अल्प उत्पन्न गट- बी | ५०.६७ ते ५२.३८पर्यंत | ५४० | १० | १४२५ | *किंमती लवकरच जाहीर केल्या जातील |
| १७ | खारकोपर पश्चिम | अल्प उत्पन्न गट | २७.१८ ते २७.४८ पर्यंत | ३२२ | ८ | ८९६ | *किंमती लवकरच जाहीर केल्या जातील |
| एकूण | | | | | | ९२४९ | |

अस्वीकरण: कार्पेट क्षेत्रामध्ये बाल्कनी आणि डक्ट क्षेत्राचा (जिथे लागू असेल तिथे) समावेश आहे. रेरा कार्पेट क्षेत्र करारपत्रामध्ये नमूद केले जाईल. (उदा: इरादा पत्र, वाटप पत्र आणि करारपत्र)

# प्रकल्प तपशील -महारेरा

खारघर पूर्व (तळोजा), सेक्टर-२८
P५२०००२८२८७

खारघर पूर्व (तळोजा), सेक्टर-३९
P५२०००४५४४६

खारघर बस डेपो
P५२०००२८११६

खारकोपर २ए
P५२०००३३७०४

खारकोपर २बी
P५२०००३३७०५

कळंबोली बस डेपो
P५२०००२८१८३

बामणडोंगरी
P५२०००२८२०९

खारघर पूर्व (तळोजा), सेक्टर-३७
P५२०००२८२४०

पनवेल (प) बस टर्मिनस
P५२०००२८११५

खारघर बस टर्मिनस
P५२०००२८२०४

मानसरोवर रेल्वे स्टेशन
P५२०००३०४११

खांदेश्वर रेल्वे स्टेशन
P५२०००२८२४६

खारकोपर-भूखंड क्र. ३, सेक्टर-१६ ए
P५२०००३३५४२

वाशी ट्रक टर्मिनस
P५१७०००३०१००

खारघर स्टेशन
P५२०००३२९४४

खारकोपर भूखंड क्र ३ (विस्तार)
P५२०००३३५४२

खारकोपर ( प )
P५२०००३२९४४

https://maharera.maharashtra.gov.in/

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सान्निध्यात




## प्रकल्प सुविधा

| | | |
|---|---|---|
| उद्यान | लहान मुलांसाठी खेळण्याची जागा | सामुदायिक केंद्र |
| रिफ्लेक्सोलॉजी पदपथ | पार्टी व खेळाचे लॉन | बहुउद्देशीय खेळाची जागा |
| गेझेबो | प्रवेश द्वार | बसण्याची जागा |

*सूचीबद्ध सुविधा केवळ सूचक आहेत आणि त्या प्रकल्पानुसार बदलू शकतात.

# सिडको महागृहनिर्माण योजना-गट



ही योजना 'सर्वांसाठी घर' या संकल्पनेवर आधारित आहे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न असलेल्या समाजघटकांना निश्चित किंमतीत परवडणारी घरे उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. योजनेत खालील दोन गट समाविष्ट आहेत –

## १. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस)

ज्या अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ ६ लाखांपर्यंत असेल, तो आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटातील असेल.

अर्जदाराचे वय अर्ज नोंदणीच्या वेळी १८ वर्षे किंवा त्याहून अधिक असावे.

अर्जदार किंवा त्यांचा/तिचा पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांचे भारतात पक्के घर असू नये.
भारतामध्ये स्वतःचे पक्के घर नसलेला कमावता सदस्य (वैवाहिक स्थिती काहीही असो) स्वतंत्र कुटुंब म्हणून गणला जाऊ शकतो.

अर्जदाराचे महाराष्ट्र राज्यात १५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळ वास्तव्य असावे.

सरकारकडून ₹ २.५ लाखांचे अनुदान लागू आहे. यामध्ये रु. १.५ लाख केंद्र सरकारकडून आणि रु. १ लाख राज्य सरकारकडून दिले जातील. कृपया लक्षात घ्यावे, जर सह-अर्जदाराने (पत्नी, आई, आश्रित इ.) यापूर्वीच सरकारी अनुदानाचा लाभ घेतला असेल, तर अर्जदाराला या योजनेसाठी सरकारच्या अनुदानाचा लाभ घेता येणार नाही.

लाभार्थी कुटुंबामध्ये पती, पत्नी तसेच अविवाहित पुत्र आणि/किंवा अविवाहित कन्यांचा समावेश असेल.

लाभार्थी कुटुंबाकडे अर्जदाराच्या नावावर किंवा कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या नावावर भारतातील कुठेही पक्के घर (सर्व ऋतूंमध्ये राहण्यायोग्य निवास) असता कामा नये.

प्रौढ कमावत्या सदस्याला, वैवाहिक स्थिती काहीही असो, स्वतंत्र कुटुंब म्हणून गणले जाऊ शकते, परंतु जर त्याच्या/तिच्या नावावर भारतात कुठेही पक्के घर (सर्व ऋतूंमध्ये राहण्यायोग्य निवास) नसेल.

विवाहित जोडप्याच्या बाबतीत, उत्पन्न पात्रतेच्या निकषांची पूर्तता झाल्यास, पती किंवा पत्नी किंवा दोघेही संयुक्त मालकीत असले तरी त्यांना केवळ एका निवास युनिटसाठीच पात्रता राहील.

## २. अल्प उत्पन्न गट (एल.आय.जी)

ज्या अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ ६ लाखांपेक्षा जास्त असेल, तो अल्प उत्पन्न गटातील आहे.

अर्जदाराचे वय अर्ज नोंदणीच्या वेळी १८ वर्षे किंवा त्याहून अधिक असावे.

अर्जदार किंवा त्यांचा/तिचा पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांच्या नावावर नवी मुंबईत घर नसावे.

अर्जदाराचे महाराष्ट्र राज्यात १५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळ वास्तव्य असावे.

टीप: या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील अर्जदारास अल्प उत्पन्न गटासाठी सदनिका अर्ज करण्याची मुभा आहे; मात्र अल्प उत्पन्न गट प्रवर्गातील अर्जदारास आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक सदनिकेसाठी अर्ज करता येणार नाही.

# पात्रता निकष

अर्जनोंदणीच्या तारखेला, अर्जदाराचे वय १८ वर्षे किंवा १८ वर्षांहून अधिक असावे.

## गटाच्या आधारे:

अ. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी (EWS), अर्जदारांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ ६,००,००० /- (सहा लाख रुपये) पर्यंत असावे.

ब. अल्प उत्पन्न गटासाठी(LIG), अर्जदारांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ ६ लाखांपेक्षा अधिक असावे. अल्प उत्पन्न गटासाठी कोणतीही उत्पन्न मर्यादा नाही.

**कौटुंबिक वार्षिक म्हणजे अर्जदार आणि त्यांचा /त्यांची पती /पत्नी सोबतच्या मागील सलग १२ महिन्यांतील एकत्रित वार्षिक उत्पन्नाची गणना .**

उत्पन्नाचा पुरावा म्हणून (मूलभूत वेतन महागाई भत्ता (DA) + CAA + सर्व प्रकारचे भत्ते (वैद्यकीय / धुलाई / शिक्षण / प्रवास / कॅन्टीन / HRA वगळता) विशेष भत्ते + बोनस + ओव्हरटाइम याचा विचार केला जाईल.) या पैकी कोणतेही एक कागदपत्र आवश्यक आहे:

१. कुटुंबातील सर्व सदस्यांचे आर्थिक वर्ष २०२४-२०२५ चा आयकर परतावा (ITR) तपशीलात्मक असावा.

२. तहसीलदाराने दिलेले मागील वर्षाचे आर्थिक उत्पन्न प्रमाणपत्र. (फक्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटासाठी)

३. मागील १२ महिन्यांच्या वेतन पावत्या.

४. नियोक्त्याने (Employer) दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र.

५. जर सह-अर्जदार कमावता नसेल तर, तसे हमीपत्र जमा करणे आवश्यक आहे. (कृपया फॉम G बघावा)



## २. पक्क्या घराच्या ताब्या संबंधी:

अ. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS)अर्जदार किंवा त्यांचा/त्यांची पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांचे भारतात पक्के घर नसावे.

ब. अल्प उत्पन्न गटातील अर्जदार (LIG) किंवा त्यांचा/त्यांची पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांच्या नावावर नवी मुंबईत घर नसावे.

## ३. अधिवास प्रमाणपत्र (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट या दोन्ही गटांसाठी):

अधिवास प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अधिवास प्रमाणपत्र जुने असल्यास अर्जदाराला त्याचे बारकोडसह नूतनीकरण करणे आवश्यक आहे (माजी सैनिकांसाठी ही अट शिथील करण्यात आली आहे).



## ४. सामाजिक प्रवर्ग निकष (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट या दोन्ही गटांसाठी):

**संवैधानिक आरक्षित प्रवर्ग:**

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती | ११.०% |
| अनुसूचित जमाती | ६.०% |
| अधिसूचित जमाती | १.५% |
| विमुक्त जमाती | १.५% |

अ. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक त्या स्वरूपात सादर करणे गरजेचे आहे.

ब. दिव्यांग (शारीरिक विकलांग) – ५.०% आरक्षण

क. गैर-संवैधानिक प्रवर्ग (लागू असल्यास): सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेअंतर्गत गैर-संवैधानिक प्रवर्गासाठी आरक्षण खालीलप्रमाणे:

| प्रवर्ग | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | अल्प उत्पन्न गट |
|---|---|---|
| प्रकल्पग्रस्त | ५% | २.५% |
| माथाडी | ५% | २.५% |
| राज्य शासकीय कर्मचारी | १% | ५% |
| माजी सैनिक | १.५% | १.५% |
| धार्मिक अल्पसंख्याक | २.५% | २.५% |
| पत्रकार | १% | १% |
| सिडको कर्मचारी | नाही | ०.५% |

कृपया नोंद घ्यावी, या पुस्तिकेतील परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेले सर्वप्रकारचे संबंधित प्रमाणपत्रे आणि कागदपत्रे वैध व योग्य स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे.

# सर्वसाधारण अटी

## अ. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटासाठी:

१. विवाहित अर्जदारांसाठी सह-अर्जदार म्हणून पती/ पत्नी असणे अनिवार्य आहे.

२. जर पुरुष अर्जदार अविवाहित असेल तर आई सह-अर्जदार असू शकते.

३. जर पहिला अर्जदार महिला असेल, तर सह-अर्जदार ऐच्छिक आहे.

४. लक्षात असू द्या की प्रथम अर्जदार एकल / अविवाहित असल्यास तसे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

५. पीएमएवाय प्रमाणपत्र (जर अर्जदाराला शासकीय अनुदान घ्यायचे असल्यास), - अर्जदारांनी केंद्र सरकारच्या वेबसाइटवर https://pmaymis.gov.in किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोंदणी केलेली असावी. पीएमएवाय २.० प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाही.

६. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटामधील कुटुंबात प्रौढ महिला सदस्य नसल्यास, अर्ज फक्त पुरुष सदस्यांच्या नावावरच करता येईल.

७. दि. ०९/१२/२०२२ च्या संचालक मंडळ ठराव क्र. १२६३३ अनुसार करार झाल्याच्या तारखेपासून ५ वर्षांच्या कालावधीत सदनिका विकता किंवा हस्तांतरित करता येणार नाही. आरक्षित प्रवर्गातील अर्जदारांना ताबा मिळाल्यानंतर ५ वर्षांनंतर, सदनिका फक्त समान आरक्षण प्रवर्गातील व्यक्ती/व्यक्तींना हस्तांतरित करता येईल, यासाठी महामंडळाकडून लेखी परवानगी आणि हस्तांतरणाच्या वेळी लागू असलेल्या शुल्काची रक्कम भरावी लागेल.

८. चुकीच्या/खोट्या नावाने केलेले अर्ज किंवा यापूर्वी पीएमएवायचा लाभ घेतलेल्या अर्जदारांचे अर्ज रद्द केले/ नाकारले जातील.



## ब. अल्प उत्पन्न गटासाठी:

करार झाल्यानंतर ३ वर्षांच्या कालावधीपर्यंत सदनिका विकता किंवा हस्तांतरित करता येणार नाही. आरक्षित गटासाठी, ताबा मिळाल्यानंतर ३ वर्षांनंतर, सदनिका फक्त समान आरक्षण गटातील व्यक्तीलाच हस्तांतरित करता येईल, यासाठी महामंडळाकडून लेखी परवानगी आणि हस्तांतरणाच्या वेळी लागू असलेल्या शुल्काची रक्कम भरावी लागेल.

## क. सदनिकेची संयुक्त मालकी:

सिडको विक्री कराराच्या अंमलबजावणी करण्यापूर्वी सदनिकाधारकाने आपल्या पतीचे किंवा पत्नीचे नाव वाटपित सदनिकेकरीता संयुक्त मालक म्हणून समाविष्ट करण्याबाबतची विनंती, सिडकोस प्रशासकीय शुल्क म्हणून रु. ५,०००/- अदा केल्यावर आणि त्यासाठीची आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यावर मान्य केली जाऊ शकते.



## ड. इतर अटी:

१. किमतीत बदल झाल्यास संबधित आर्थिक वर्षातील चालू दरच वाटपधारकांना लागू केले जातील.

२. अल्प उत्पन्न गटासाठी (LIG)६व्या मजल्यापासून त्यावरील मजल्यासाठी मजला दर १०/- रुपये प्रति चौरस फूट प्रति मजला लागू आहे.

३. घरांच्या वाटपासाठी नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम २००८ मधील तरतुदी लागू होतील.

४. सर्व सदनिकांचे वाटप "जशी आहे तशीच स्थिती" या तत्त्वावर केले जाईल..

५. वाटपीत केलेल्या सदनिका बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.



६. कुटुंबातील एकाच सदस्याला या गृहयोजनेचा लाभ मिळू शकेल. ज्या प्रकरणामध्ये लाभार्थी आणि त्यांचे कुटुंबीयांना एकापेक्षा जास्त वेळा सदनिका मिळाले असल्याचे आढळल्यास असे वाटप रद्द होऊ शकते.

७. चटई क्षेत्र (कार्पेट एरिया), विक्री दर, आणि सदनिकाची संख्या यासंबंधित तपशील अंदाजित आहेत आणि ते बदलू शकतात.

८. अर्जदाराने हेतुपुरस्पर अर्जात चुकीची माहिती दिल्यास, असे अर्ज नाकारले जातील.

९. अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जमाती (DT), आणि भटक्या जमाती (NT) यांसारख्या आरक्षित प्रवर्गातील यशस्वी अर्जदारांनी पात्रता तपासणीसाठी जात वैधता प्रमाणपत्राची छायाप्रती सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, संबंधित अर्जदाराने करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी ते प्राप्त करून सादर करणेअनिवार्य आहे.

१०. इतर आरक्षित प्रवर्गातील अर्जदारांनी सक्षम प्राधिकरणाचे आवश्यक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११. संबंधित महापालिका/ सक्षम प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) प्राप्त झाल्यानंतरच सदनिकांचा ताबा दिला जाईल. कोणत्याही कारणास्तव भोगवटा प्रमाणपत्राला विलंब झाल्यास, सदनिकाधारकास महामंडळाला अदा केलेल्या रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.


१२. सदनिका लाभार्थींद्वारे सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना:

अ. विक्री कराराच्या अंमलबजावणी करून वाटपित सदनिकेचा ताबा घेतल्यानंतर, सदनिकाधारक संबंधित सोसायटीचे संबंधित गृहनिर्माण संस्थेचे भागधारक (शेअर होल्डर) बनतील. न विकल्या गेलेल्या गाळ्यांसाठी सिडको लि. या सोसायटीचे भागधारक/सदस्य असेल. तथापि, परंतु भविष्यात जेव्हा या सदनिका ज्या व्यक्तींना विकल्या जातील त्यावेळी सिडकोच्या जागी अशा व्यक्तींना कंपनीचे/गृहनिर्माण संस्थेचे भागधारक सदस्य म्हणून दाखल केले जाईल. सदनिकाधारकांची नवी सोसायटी स्थापन करून नोंदणी करायचे ठरविल्यास, प्रत्येक सभासदाला नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम २००८ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था. अधिनियम, १९६० चे पालन करणे बंधनकारक असेल. निर्धारित कालावधीपूर्वी कोणत्याही भागधारक/सदस्याला वाटपीत सदनिकेवरील हक्क दुसऱ्याला हस्तांतरित करण्यास, अथवा सदनिकेबाबत कोणत्याही प्रकारची तृतीय पक्षाची व्याज निर्मिती करण्यास, किंवा संस्थेला अशा हस्तांतरणास परवानगी देण्यास, सिडकोच्या पूर्वलिखित परवानगीशिवाय अनुमती दिली जाणार नाही.

ब. सहकारी संस्थेने, गरजेनुसार, नियमितपणे सिडकोला वेळोवेळी ठरवलेल्या दरानुसार भाडेपट्टी भरावी. कंपनी किंवा संस्था / त्यांचे सदस्य, गरजेनुसार, नवी मुंबई महानगरपालिका / पनवेल महानगरपालिका किंवा शासनास थेट मालमत्ता कर, उपकर (सेस) सह GST, जमिनीवरील महसूल जो ठरवण्यात आला आहे किंवा कालांतराने निश्चित केला जाईल, असा भाडेतत्त्वावर देण्यात आलेल्या जमीन/इमारतीसाठी किंवा सदनिका धारकांना विकल्या गेलेल्या सदनिकांवर भरावा. तसेच, कंपनी/सोसायटी आणि सदनिका धारक या सर्वांनी सर्व स्थानिक/सरकारी अधिकाऱ्यांचे आणि सिडको लि. चे सर्व नियम व अटींचे पालन करणे आवश्यक आहे.

क. सदनिकेचा ताबा दिल्यानंतर इमारत निवास योग्य राहावी याकरीताचा खर्च गृहनिर्माण संस्था करतील आणि संपूर्ण इमारत किंवा इमारतीचा एखादा भाग यांस कोणतेही नुकसान पोहोचणार नाही याकडे लक्ष पुरवतील.

ड. सदनिकाधारक आपल्या सदनिकेमध्ये कोणत्याही प्रकारचा बांधकामविषयक बदल करू शकणार नाही किंवा सदनिकेचा वापर केवळ निवासासाठीच करेल. सदनिका धारकांची कंपनी/गृहनिर्माण संस्था, यापैकी जे कोणी असेल ते, सदनिकेमध्ये वाढीव बांधकाम/बांधकामविषयक बदल करू शकणार नाही तसेच आपल्या सभासदांनीही तसे करण्याची परवानगी देऊ शकणार नाही असे अनधिकृत बांधकामावर महामंडळाकडून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.



१३. कोणत्याही न्यायालयीन विवाद किंवा खटल्यांचे प्रकरण प्रलंबित असल्यास किंवा उद्भवल्यास किंवा वाटपित सदनिकेमध्ये पूर्वीच्या वाटपाची बाब आढळल्यास, तपासणीनंतर घेण्यात आलेला योग्य निर्णय अर्जदारासाठी बंधनकारक असेल.

१४. सिडको प्रस्तावित संस्थेस विक्री न झालेल्या सदनिकांचे देखभाल शुल्क चुकते करणार नाही. शिल्लक अपार्टमेंट्स आणि व्यावसायिक घटकांची विक्री करण्याचा अधिकार सिडकोकडे राखीव आहे.



१५. सदर योजनेतील सदनिकांची किंवा वाणिज्यिक घटकांची विल्हेवाट लावण्याबाबतच्या अटी व शर्तींचा अर्थ लावण्याबाबत किंवा अन्य कोणत्याही विषयाबाबत वाद निर्माण झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय हा मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचा असेल आणि सदर निर्णय सर्व पक्षांस लवादाचा निर्णय म्हणून बंधनकारक असेल.

१६. हक्क आणि लाभ यांचे कायदेशीर वारसास हस्तांतरण:

अ. अर्जदाराच्या मृत्यूनंतर, संबंधित अर्जदाराच्या कायदेशीर वारसाची जबाबदारी असेल की त्यांनी सिडकोला माहिती पुरवावी ज्यामध्ये वाटपीत सदनिकेची विक्री किंमत आणि इतर शुल्क भरल्याचा समावेश आहे, तसेच संबंधित अटी व शर्तींचे पालन करावे. संबंधित वारसाने त्वरित न्यायालयाकडून जारी केलेला त्यांच्या वारस दाखला (Heirship Certificate) किंवा उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) न्यायालयाकडून जारी केलेले सादर करावे, जे अर्जदाराच्या मृत्यूनंतर त्वरित लागू राहील.

ब. वारसदाखला किंवा उत्तराधिकारी प्रमाणपत्राच्या आधारे, मृत अर्जदाराच्या नावावर असलेले घर कायदेशीर वारसांच्या नावावर हस्तांतरित करण्यात येईल. मृत अर्जदाराच्या कायदेशीर वारसाकडून घर हस्तांतरणासाठी कोणतेही हस्तांतरण शुल्क आकारले जाणार नाही. मात्र, जर मृत अर्जदाराने आर्थिक संस्था/बँकेकडून कर्ज घेतले असेल, तर कायदेशीर वारसांनी संस्थेचा ना हरकत प्रमाणपत्र (NOC) प्राप्त करणे आवश्यक असेल. अशा हस्तांतरणासाठी कायदेशीर वारसाला सिडकोने ठरवलेल्या प्रशासकीय शुल्काचा भरणा करावा लागेल.

# बुकिंगची पद्धत

संपूर्ण अर्ज/नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन आहे, आणि वाटप प्रक्रियाही ऑनलाईन प्रणालीद्वारेच होईल.



- नोंदणी विंडो उघडल्याची सूचना दिली जाईल.
- ज्या ग्राहकांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले आहे, त्यांना त्यांच्या पसंती निवडण्यासाठी सूचित केले जाईल. ग्राहक एकूण १५ पसंती निवडू शकतो. त्या १५ पसंतीचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे:

अ. अर्जदार सोडतीच्या ३ फेऱ्यांमध्ये भाग घेऊ शकतात.


ब. प्रत्येक फेरीत ग्राहक त्याच्या किमान १(एक) व कमाल ५ (पाच) निवडी देऊ शकतो,

क. निवडलेल्या प्रत्येक प्रकल्प स्थळावरील टॉवर व मजल्यांच्या जास्तीत जास्त ३ पसंती निवडू शकतो. कुठल्याही सोडत फेरीमध्ये प्रकल्प स्थळाबाबत कोणतीही मर्यादा नाही, परंतु प्रत्येक फेरीत एकूण ५ पसंतीची मर्यादा आहे.

ड. अर्जदार कोणत्याही ३ फेऱ्यांमध्ये यशस्वी न झाल्यास, लॉटरीच्या ४थ्या फेरीत अर्जदारास "कोणतीही सदनिका वाटप करा" या पर्यायासाठी संमती द्यावी लागेल. या फेरीमध्ये अर्जदार पुढीलपैकी कोणताही पर्याय निवडू शकतो: "माझ्या पसंतीच्या ठिकाणी कोणतीही सदनिका वाटप करा", किंवा "या योजनेअंतर्गत कोणत्याही ठिकाणी कोणतीही सदनिका वाटप करा", किंवा "कोणतीही सदनिका वाटप करण्यास इच्छुक नाही."

- पसंतीक्रम दिल्यानंतर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) अर्जदारांना ₹७५,०००/- तर अल्प उत्पन्न गटातील अर्जदारांना १ बीएचके सदनिकेसाठी ₹१,५०,००० आणि अल्प उत्पन्न गटातील अर्जदारांना २ बीएचके सदनिकेसाठी ₹२,००,००० बुकिंग शुल्क भरावे लागेल.

- बुकिंग रक्कमेची विंडो बंद झाल्यानंतर, पात्र ग्राहकांची मसुदा यादी प्रसिद्ध केली जाईल. ज्या ग्राहकांची नावे मसुदा यादीत नाहीत ते त्यांच्या हरकती यादी प्रकाशित झाल्यानंतर ७ दिवसांच्या आत त्यांच्या हरकती नोंदवू शकतात.
- हरकतींचे निराकरण हे हरकती नोंदवण्याच्या तारखेनंतरच्या ७ दिवसांत केले जाईल.




कलात्मक प्रतिमा

- पात्र ग्राहकांची अंतिम यादी सोडतीच्या तारखे पूर्वी प्रकाशित के ली जाईल.
- सोडतीच्या तारखा नंतर जाहीर होतील. सोडतीची अंमलबजावणी झाल्यावरती यशस्वी अज दारांची यादी सिडकोच्या संके तस्थळावर प्रदर्शित के ली जाईल आणि यशस्वी विजेत्यांना इरादा पत्र (लेटर ऑफ इं टेंट) जारी के ले जाईल.
- चौथ्या फेरीत (Allot Any) ज्या अर्जदारांना सदनिका मिळालेली आहे, त्यांनी त्याबाबत आपली संमती सादर करणे आवश्यक आहे. जर १५ दिवसांच्या आत वाटप केलेल्या सदनिकेला संमती सादर करण्यात आली नाही, तर संबंधित सदनिका वाटप महामंडळाद्वारे रद्द केली जाईल आणि कोणतीही कपात न करता बुकिंग रक्कम परत केली जाईल.
- सोडत प्रक्रियेत अपयशी ठरलेल्या ग्राहकांना बुकिंग रक्कम परत करण्यात येईल.
- दस्ताऐवज तपासणीनंतर पात्र ठरलेल्या सर्व अर्जदारांना पुष्टीकरण रक्कम भरण्यासाठी पुष्टीकरण पत्र जारी करण्यात येईल. अर्जदाराने सदनिका रद्द केल्यास किंवा दिलेल्या मुदतीपर्यंत पुष्टीकरण रक्कम न भरल्यास त्यांचे इरादा पत्र (LOI) रद्द करण्यात येईल. अशा परिस्थितीत बुकिंग रक्कम परत करण्यात येईल, मात्र रु. ५०००/- + जीएसटी इतके प्रशासकीय शुल्क वजा करण्यात येईल.
- यशस्वी अर्जदारांनी पुष्टीकरण रक्कम भरणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गासाठी रु ७५,०००/-, अल्प उत्पन्न गट (LIG)- १ बीएचकेसाठी रु १,५०,०००/-, आणि अल्प उत्पन्न गट (LIG)- २ बीएचकेसाठी रु २,००,०००/-. पुष्टीकरण रक्कम भरल्यानंतरच सदनिका वाटप पत्र (Allotment Letter) जारी करण्यात येईल.
- यशस्वी अर्जदारांनी सदनिका वाटप पत्रात नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार उर्वरित रक्कम भरावी लागेल.
- सर्व हप्ते यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर करारपत्र पूर्ण केले जाईल.

  करार प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर घराच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु केली जाईल. हस्तांतरणाच्या दिवशी घरमालकांना त्यांच्या घराची चावी सुपूर्द केली जाईल.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील अर्जदारांच्या बाबतीत, महामंडळामार्फत कराराची अंमलबजावणी करण्यापूर्वी लाभार्थ्यांचा तपशील PMAY MIS पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य राहील. PMAY MIS पोर्टलवरुन वाटप पत्र यशस्वीरीत्या तयार होऊन त्याची पुष्टी झाल्यानंतरच करार प्रक्रियेस प्रारंभ करण्यात येईल.



# ऑनलाईन नोंदणी (ई-केवायसी) प्रक्रिया:

नोंदणीच्या वेळी अर्जदाराने खालील माहिती तयार ठेवावी:

- आधार क्रमांक आणि आधार कार्डची स्वसाक्षांकित प्रत/प्रतिमा (jpg/ png/ pdf स्वरूपात - कमाल आकार २MB)
- पॅन कार्ड आणि त्याची स्वसाक्षांकित प्रत/प्रतिमा (jpg/ png/ pdf स्वरूपात - कमाल आकार २MB)
- बँक खाते तपशील आणि रद्द केलेला धनादेश
- मोबाईल क्रमांक (आधार कार्डशी लिंक असणारा)
- ई-मेल आयडी
- सह-अर्जदाराचे तपशील (लागू असल्यास)
- परिशिष्ट I मध्ये नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे
- अलिकडील छायाचित्रे




## पद्धत:

**पहिला टप्पा: अर्जदाराचे साईन-अप**

- www.cidcohomes.com या संकेतस्थळावर नोंदणी करा.
- तुमचे पूर्ण नाव आणि मोबाइल क्रमांक प्रविष्ट करा, त्यानंतर त्या मोबाईल क्रमांकावर एक लॉगिन OTP पाठवला जाईल. ग्राहकाने OTP प्रविष्ट करावा आणि खाते तयार करावे.

**दुसरा टप्पा: ई-केवायसीची पडताळणी**

- खाते तयार झाल्यानंतर, ग्राहकाने त्यांचा आधार नंबर प्रविष्ट करावा. आधारशी जोडलेल्या मोबाइल क्रमांकावर एक OTP प्राप्त होईल. ग्राहकाने त्यांच्या आधार पडताळणीसाठी तो OTP प्रविष्ट करावा.
- आधार प्रमाणित झाल्यानंतर, ग्राहकाने आपला पॅन क्रमांक प्रविष्ट करावा. पॅनची पडताळणी डिजिटल पद्धतीने होईल.

**तिसरा टप्पा: अर्जदाराचे बँक तपशील नोंदवा**

१) दिलेल्या तक्त्यानुसार बँक तपशील भरा.

२) रद्द केलेला धनादेश (Cancelled Cheque) किंवा पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत अपलोड करा.

३) जाहीरनामा सादर करा.

४) परतावा (असल्यास) फक्त याच बँक खात्यात जमा करण्यात येईल.

**चौथा टप्पा: अर्जदाराचे तपशील**

- तुमचा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गट (EWS)किंवा अल्प उत्पन्न गट (LIG)निवडून, तुमचे मासिक कौटुंबिक उत्पन्न आणि तुमच्या मालकीच्या घराचे तपशील द्या.
- वैयक्तिक तपशील भरा, जसे की तुमचा व्हॉट्सअॅप क्रमांक (हे ऐच्छिक आहे, परंतु सर्वप्रकारचे महत्त्वाचे अपडेट्स मिळवण्यासाठी तो प्रविष्ट करण्याचा सल्ला दिला जातो), वैवाहिक स्थिती, संपर्क पत्ता (तुमचा वर्तमानातील सक्रीय पत्ता) आणि सक्रिय ई-मेल आयडी. ई-मेल आयडीवर एक OTP पाठविला जाईल, ग्राहकाने ई-मेल आयडीवर प्राप्त झालेला OTP प्रविष्ट करावा आणि त्याची पडताळणी करावी. आगामी काळात योजनेशी संबंधित विविध संवाद आणि अपडेट्स मिळवण्यासाठी हे आवश्यक आहे.

- तुमच्या सह-अर्जदाराची माहिती प्रविष्ट करून, त्यांचे स्वप्रमाणित केलेले आधार आणि PAN कार्ड अपलोड करावे.
- योग्य प्रवर्ग निवडा

**अ. संवैधानिक प्रवर्गः**

महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून जात व जात वैधता प्रमाणपत्र स्वसाक्षांकित स्वरुपात सादर करणे अनिवार्य आहे. इतर राज्यांतून जारी केलेली जात प्रमाणपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

१. अनुसूचित जाती
२. अनुसूचित जमाती
३. अधिसूचित जमाती
४. विमुक्त जमाती

नोंद: जर अर्जदाराकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसेल, तर संबंधित अर्जदाराने सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यक प्रमाणपत्र प्राप्त करून करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी ते सादर करणे आवश्यक आहे. हा दस्ताऐवज अनिवार्य आहे. महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार संबंधित अर्जदाराची जात वैध नसल्याचे आढळल्यास, सदनिका वाटप रद्द करण्यात येईल व रक्कम सिडकोच्या धोरणानुसार परत करण्यात येईल.

**ब. दिव्यांग प्रमाणपत्र:** दिव्यांग व्यक्तीं हक्क अधिनियम २०१६ च्या अनुषंगाने सक्षम प्राधिकरणाकडून जारी केलेले असावे, ज्यामध्ये अर्जदाराने दिव्यांग (PH) प्रवर्गाचा दावा केलेला आहे हे प्रमाणित करणे आवश्यक आहे. यामध्ये अंधत्व, कमी दृष्टी, कुष्ठरोगातून बरे झालेले, ऐकण्याची क्षमता गमावलेले, अस्थि-चालकत्वाविषयक अपंगत्व, मानसिक मंदता, ऑटिझम, मानसिक आजार, विशिष्ट शिकण्यासंबंधी अपंगत्व, बौद्धिक अपंगत्व या गोष्टींचा समावेश आहे. पात्रतेसाठी किमान ४०% अपंगत्व असणे आवश्यक आहे.

**क. गैर-संवैधानिक प्रवर्गः** सक्षम प्राधिकाऱ्याचे वैध प्रमाणपत्र आवश्यक आहे.

- किमान ५ वर्षांची सेवा पूर्ण केलेले राज्य शासन कर्मचारी (महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक उपक्रम, महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषद कर्मचारी इत्यादी) संबंधित शासकीय विभागाच्या अधिकृत लेटरहेडवर अधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्क्यासह फॉर्म C प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

- किमान ५ वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या सिडको (CIDCO) कर्मचाऱ्यांसाठी सिडकोच्या अधिकृत लेटरहेडवर अधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह फॉर्म C प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

टीप: सिडको कर्मचारी केवळ एलआयजी / एलआयजी- ए/एलआयजी- बी या प्रवर्गांतर्गतच अर्ज करू शकतात.



३. **पत्रकार** – सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी (PRO) यांनी जारी केलेले प्रमाणपत्र आणि फॉर्म D: पत्रकारांचे घोषणापत्र

४. **धार्मिक अल्पसंख्याक** - राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग कायदा, १९९२ च्या कलम 2(क) अंतर्गत सर्व समुदायांना अल्पसंख्याक म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. शाळा सोडल्याचा दाखला (School Leaving Certificate) ज्यामध्ये धर्म नमूद आहे आणि फॉम ई: धार्मिक अल्पसंख्याक म्हणून नोंदणीकृत असल्याचे नोटरीकृत प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

५. फक्त महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त व्यक्ती (परिशिष्ट 1 पहा)

६. माजी सैनिक (लष्कर, नौदल, वायुसेना) तसेच निमलष्करी दलांचे कर्मचारी जसे बीएसएफ (BSF), सीआयएसएफ (CISF), आयटीबीपी (ITBP), एनएसजी (NSG), आसाम रायफल्स, सीआरपीएफ (CRPF), एसएसबी (SSB) आणि नेव्ही कोस्ट गार्ड तसेच त्यांचे अवलंबित.

७. माथाडी कामगार - केवळ मुंबई महानगर क्षेत्रासाठी (परिशिष्ट 1 पहा)

### चौथा टप्पा: कागदपत्र अपलोड करा:

- सर्व आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित स्कॅन केलेल्या प्रती jpg/png/pdf स्वरूपात असाव्यात, त्यांचा आकार २MB च्या आत असावा. (निवास प्रमाणपत्रासाठी बारकोड दस्ताऐवज अनिवार्य आहे.)
- अर्ज केलेल्या प्रवर्गा अंतर्गत सर्व आवश्यक असलेली हमीपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे.
- करारावर स्वाक्षरी करण्याच्या आधी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

नोंद: करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास, सदनिका वाटप रद्द करण्यात येईल आणि सिडकोच्या धोरणानुसार आवश्यक कपात करून रक्कम परत करण्यात येईल.

### पाचवा टप्पा: अर्जाचे शुल्क भरा:

अर्जदारांना लागू असलेल्या अर्ज शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.

- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गट व अल्प उत्पन्न गट या दोन्ही गटांमध्ये GST समाविष्ट असलेले ₹ २००/- +जी एस टी शुल्क भरावे लागेल. (अर्ज शुल्क विनापरतावा आहे. कृपया याची नोंद घ्यावी) शुल्काचा भरणा पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन केला जाईल. देयकाचा भरणा ऑनलाईन पेमेंट गेटवेच्या माध्यमातून करावा लागेल.
- शुल्काचा भरणा करण्यापूर्वी अर्जदाराने अर्जाची सत्यता पडताळून योग्य अर्ज भरल्याची खातरजमा करून घ्यावी. एकदा शुल्क भरल्यानंतर अर्जदाराला अर्जामध्ये किंवा निवडलेल्या गट-प्रवर्गात कोणतेही बदल करता येणार नाहीत. अर्जदार 'माझे खाते' विभागातून त्यांनी सादर केलेला अर्ज व पेमेंट पावती डाउनलोड करू शकतात.
- कृपया, अर्जाचे शुल्क भरल्यानंतर अर्जदाराला त्यांच्या अर्जात कुठल्याही प्रकारची सुधारणा करण्याची संधी मिळणार नाही याची नोंद घ्यावी.



# तुमच्या पसंतीचे स्थळ, टॉवर आणि मजला क्रमांक निवड



- ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर, अर्जदाराने त्याच्या खात्यावर लॉगिन करून १५ पसंती सादर कराव्यात.
- १५ पसंतींचे वितरण समजून घ्या:
  १. एकूण ३ संचामध्ये पसंत निवडी असतील,त्यातअर्जदाराने त्याच्या/तिच्या पसंती निवडाव्यात.
  २. प्रत्येक संचात, अर्जदार जास्तीत जास्त ५ पसंती निवडू शकतो.
  ३. पसंती म्हणजे, अर्जदार एखाद्या विशिष्ट प्रकल्पाचे स्थळ, टॉवर आणि मजल्याचा क्रमांक निवडू शकतो.
  ४. प्रत्येक संचामध्ये, अर्जदाराने कमीत कमी १ प्रकल्प स्थळ, टॉवर क्रमांक आणि मजल्याचा क्रमांक निवडणे आवश्यक आहे.
  ५. अर्जदार प्रत्येक प्रकल्प स्थळावर जास्तीत जास्त ३ पसंती देऊ शकतो.
  ६. सोडतीच्या ३ फेऱ्या होतील. पसंती निवडीच्या संच १ मध्ये निवडलेली पसंती पहिल्या फेरीत घोषित होईल, संच २ मधील निवड दुसऱ्या फेरीत, आणि संच ३ मधील निवड तिसऱ्या फेरीत घोषित होईल.
  ७. जर अर्जदार पहिल्या फेरीत यशस्वी ठरला, तर त्याचा अर्ज पुढील दुसऱ्या व तिसऱ्या फेरींसाठी विचारात घेतला जाणार नाही.
  ८. जर अर्जदार पहिल्या फेरीत अयशस्वी ठरला, तर त्याचा अर्ज स्वयंचलितपणे पुढील फेऱ्यांसाठी विचारात घेतला जाईल.
  ९. अर्जदार कोणत्याही ३ फेऱ्यांमध्ये यशस्वी न झाल्यास, लॉटरीच्या ४थ्या फेरीत अर्जदारास "कोणतीही सदनिका वाटप करा" या पर्यायासाठी संमती द्यावी लागेल. या फेरीमध्ये अर्जदार पुढीलपैकी कोणताही पर्याय निवडू शकतो: "माझ्या पसंतीच्या ठिकाणी कोणतीही सदनिका वाटप करा", किंवा "या योजनेअंतर्गत कोणत्याही ठिकाणी कोणतीही सदनिका वाटप करा", किंवा "कोणतीही सदनिका वाटप करण्यास इच्छुक नाही."
- पसंतींची पुष्टी केल्यानंतर, अर्जदाराने खालीलप्रमाणे बुकिंग शुल्क भरावे:

अ. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) अर्जदार- ₹ ७५,०००/-
ब. अल्प उत्पन्न गट-ए (LIG A) अर्जदार - ₹१,५०,०००/-
क. अल्प उत्पन्न गट-बी (LIG B) अर्जदार - ₹ २,००,०००/-

# सोडत प्रक्रिया आणि क्रम

१. सोडत प्रक्रिया शारीरिक अपंग (PH) प्रवर्गातील अर्जदारांना अर्जांमध्ये प्राधान्य देण्याने सुरू होईल. त्यानंतर अन्य प्रवर्गांचा विचार केला जाईल.

२. प्रत्येक सोडत फेरीसाठी सर्व प्रवर्गातील अर्जदारांची त्यांच्या प्राधान्यानुसार निवड करण्यासाठी याद्दच्छिक निवड प्रणाली (Randomizer) वापरण्यात येईल.

३. एकदा अर्जदार प्रणालीमध्ये क्रमवारीत आल्यावर, सर्वप्रथम त्याचा/तिचा प्रवर्ग तपासला जाईल. त्यानंतर त्या विशिष्ट प्रवर्गातील उपलब्ध सदनिकेची पडताळणी केली जाईल.

४. जर साठा उपलब्ध असेल, तर प्रणाली ग्राहकाची पहिली पसंत तपासेल. जर त्यांच्या पहिल्या पसंतीतील सदनिका उपलब्ध असेल, तर ती सदनिका त्यांना वाटपीत केली जाईल आणि त्यांच्या उर्वरीत पसंती स्वयंचलितपणे रद्दबातल होतील.

५. जर पहिली पसंती उपलब्ध नसेल, तर ग्राहकाच्या उर्वरित पसंती तपासल्या जातील. जर पाचही पसंती उपलब्ध नसतील, तर ग्राहकाला न-वाटपितांच्या सूचीमध्ये ठेवले जाईल.

६. पहिल्या फेरीत साठा शिल्लक राहिल्यास, त्याच प्रक्रियेचा वापर दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीतही केला जाईल.

७. अर्जदार सोडतीच्या तिन्ही फेऱ्यांमध्ये अपयशी ठरल्यास, महामंडळ (सिडको) उपलब्ध असलेल्या सदनिकांच्या आधारे याद्दच्छिक (Random) पद्धतीने सदनिका वाटप करेल. अशा परिस्थितीत, अर्जदाराने आपली संमती सादर करणे आवश्यक आहे. अर्जदाराला अर्ज फक्त प्राधान्य दिलेल्या स्थानासाठी विचारात घ्यायचा आहे की इतर स्थानासाठी मान्य आहे हे नमूद करावे . एकदा सदनिका वाटप झाल्यानंतर, अर्जदाराने ती स्वीकारली असल्याचे लेखी रूपात सादर करणे आवश्यक आहे. जर १५ दिवसांच्या आत सदनिकेच्या वाटपाची स्वीकृती सादर करण्यात आली नाही, तर प्राधिकरण सदर वाटप रद्द करून बुकिंग रक्कम परत करेल.

८. दस्ताऐवजांची पडताळणी केल्यानंतर अर्जदाराला एक पुष्टीकरण पत्र दिले जाईल ज्यामध्ये अर्जदारांना ₹ ७५,०००/- (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी), ₹ १,५०,०००/- (अल्प उत्पन्न गटासाठी - १ बीएचके), ₹ २,००,०००/- (अल्प उत्पन्न गटासाठी - २ बीएचके) पुष्टीकरण रक्कम भरण्यास सांगितले जाईल. पुष्टीकरण रक्कम भरल्यानंतर वाटप पत्र दिले जाईल.

९. जर अर्जदाराने घराचा ताबा रद्द केला किंवा पत्र मिळाल्यानंतरही पुष्टीकरण रक्कम भरली नाही, तर इरादा पत्र (LOI) रद्द करण्यात येईल आणि बुकिंग शुल्क परत करण्यात येईल. मात्र, प्रशासकीय शुल्क म्हणून ₹ ५,०००/- वजावट करण्यात येईल.



# देयकाच्या अटी व शर्ती

- देयकाचा भरणा करावयाचा तपशील वाटप पत्रात दिला जाईल.
- हप्त्यांचा भरणा :
  - अ. बुकिंग आणि पुष्टीकरण रक्कम वगळता, लाभार्थ्याने घराच्या विक्री किंमतीतील शिल्लक रक्कम व विविध संकीर्ण शुल्कांचा भरणा वाटप पत्रात दिलेल्या हप्त्यांच्या वेळापत्रकानुसार करावा.
  - ब. निर्धारित वेळेत हप्त्यांचा भरणा न केल्यास अर्जदाराला लागू असलेले विलंबित देयक शुल्क (DPC) भरावे लागेल.
- किंमत : वाटपित करण्यात येणाऱ्या सदनिकेची किंमत वाटप पत्रात नमूद केली जाईल.
- अतिरिक्त शुल्क – मजला वाढ शुल्क :
  - अ. सर्व स्थळावरील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) गटातील घरांसाठी मजला वाढ शुल्क आकारले जाणार नाही.
  - ब. अल्प उत्पन्न गटासाठी (LIG)६व्या मजल्यापासून त्यावरील मजल्यासाठी मजला दर ₹ १०/- प्रति चौरस फूट प्रति मजला लागू आहे.
- नोंदणी रक्कमेची जप्ती :

  अर्जदाराने भरलेले नोंदणी शुल्क पुढील कारणाने जप्त केले जाईलः
  - अ. जर यशस्वी अर्जदाराने वाटप पत्र मिळाल्यानंतर जर घर मागे घेतले/समर्पित केल्यास.
  - ब. जर अर्जदाराने खोटी माहिती दिल्यास किंवा चुकीची कागदपत्रे सादर केल्यास व त्यानंतर अपात्र ठरल्यास.
  - क. जर अर्जदाराने योजनेच्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यास.
- रद्द करणे/ समर्पण :

  वाटप पत्र जारी झाल्यानंतर, जर वाटपधारकाने सदनिका समर्पित केली/रद्द केली, तर एकूण बुकिंग रक्कम तसेच भरलेल्या हप्त्यांपैकी 10% रक्कम (असल्यास, पुष्टीकरण रक्कम वगळून) जप्त करण्यात येईल. अशा प्रकारच्या चुकांमुळे झालेल्या कोणत्याही नुकसान किंवा हानीसाठी वाटपधारकाकडून नुकसानभरपाई वसूल करण्याचा सिडकोचा हक्क अबाधित राहील आणि सदनिकेचे वाटप रद्द करण्यात येईल.
- गहाण ना हरकत प्रमाणपत्र (NOC) शुल्क :
  - अ. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटातील घरांच्या पहिल्या वेळच्या PMAY अंतर्गत जारीकरणासाठी गहाण ना हरकत प्रमाणपत्र (NOC) शुल्क आकारले जाणार नाही. नंतर ना हरकत प्रमाणपत्र (NOC) मिळण्यासाठी प्रति अर्ज ₹ १००/- + जीएसटी शुल्क लागू होईल.
  - ब. अल्प उत्पन्न गटासाठी (LIG) गहाण ना हरकत प्रमाणपत्र (NOC) शुल्क ₹ २५०/- + GST आकारले जाईल.



# परिशिष्ट I (कागदपत्रे)

| 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' योजनेसाठी नोंदणी करताना अर्जदाराकडून आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी | |
|---|---|
| सर्व अर्जदारांसाठी अनिवार्य | - अर्जदाराचे आधार कार्ड व आधारशी लिंक असलणारा मोबाईल क्रमांक<br>- अर्जदाराचे पॅन कार्ड<br>- रहिवास प्रमाणपत्र - माजी सैनिकांना सूट (महाराष्ट्रातील कोणत्याही भागात किमान १५ वर्ष वास्तव्य असावे)<br>ई-मेल आयडी<br>- अलिकडील छायाचित्र<br>- उत्पन्नाचा पुरावा (मूलभूत वेतन + महागाई भत्ता (DA) + CAA + सर्व प्रकारचे भत्ते (वैद्यकीय/धुलाई/ शैक्षणिक/प्रवास/कॅन्टीन/HRA वगळता) + विशेष भत्ते + बोनस + ओव्हरटाइम याचा विचार केला जाईल. या पैकी कोणतेही एक कागदपत्र आवश्यक आहे.<br>१ कुटुंबातील सर्व सदस्यांचा आर्थिक वर्ष २०२४-२५ चा आयकर परतावा (ITR) तपशीलात्मक असावा.<br>२ तहसीलदाराने दिलेले मागील वर्षाचे आर्थिक उत्पन्न प्रमाणपत्र. (फक्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटासाठी)<br>३ मागील १२ महिन्यांच्या वेतन पावत्या.<br>४ नियोक्त्याद्वारे (Employer) प्राप्त उत्पन्न प्रमाणपत्र.<br>६ जर सह-अर्जदार कमावता नसेल तर, तसे घोषणापत्र जमा करणे आवश्यक आहे. (कृपया फॉर्म G बघावा)<br>७ सह-अर्जदाराचे आधार कार्ड (लागू असल्यास)<br>- सह-अर्जदाराचे पॅन कार्ड (लागू असल्यास)<br>- |

| वरीलप्रमाणे अतिरिक्त | |
|---|---|
| गट A - आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) (ईडब्ल्यूएस - पीएमएवाय): | - फॉर्म A प्रतिज्ञापत्र : अर्जदार किंवा त्यांचा/त्यांची पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांच्या नावावर भारतात पक्के घर नसावे.<br>- पीएमएवाय प्रमाणपत्र (जर अर्जदाराला शासकीय अनुदान घ्यायचे असल्यास)<br>- अर्जदारांनी केंद्र सरकारच्या https://pmaymis.gov.in या संकेत स्थळावर किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोंदणी केलेली असावी. |
| गट B - अल्प उत्पन्न गट (LIG) | फॉर्म B: प्रतिज्ञापत्र : अर्जदार किंवा त्यांचा/त्यांची पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांच्या नावावर नवी मुंबईमध्ये घर नसावे. |

| | उप-गट अ - संवैधानिक प्रवर्ग |
|---|---|
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ भटक्या जमाती/विमुक्त जमाती: | - सक्षम प्राधिकरणाद्वारे जारी केलेले जात प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>- सक्षम प्राधिकरणाद्वारे जारी केलेले जात पडताळणी प्रमाणपत्र (लागू असल्यास) |

| दिव्यांग (शारिरीक विकलांग) | |
|---|---|
| दिव्यांग (शारिरीक विकलांग) | दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या अनुषंगाने सक्षम प्राधिकरणाद्वारे जारी करण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र (अंधत्व, कमी दृष्टि, कुष्ठरोग बरा झालेला, ऐकू येत नसलेले, चालण्यास अक्षम, मानसिक मंदत्व, ऑटिझम, मानसिक रोग, विशिष्ट शिकण्याची अक्षमता, बुद्धिमत्ता अक्षमता - पात्रतेसाठी शारीरिक अक्षमतेची किमान टक्केवारी ४०% असावी.) |

| उप-गट B – गैर-संवैधानिक | |
|---|---|
| सेवारत राज्य सरकारी कर्मचारी/ स्थानिक स्वराज्य संस्था/ राज्याच्या सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी (किमान 5 वर्षांची सेवा आवश्यक): | सरकारी आस्थापनेच्या लेटरहेडवर फॉर्म C/ कर्मचारी ओळखपत्र |
| सिडको कर्मचारी (संस्थेत किमान ५ वर्ष सेवा कालावधी पूर्ण झालेला असावा) | सिडकोच्या लेटरहेडवर फॉर्म-C/ कर्मचारी ओळखपत्र |
| महाराष्ट्रातील पत्रकार | फॉर्म D: पत्रकारांचे प्रतिज्ञापत्र आणि सिडकोच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी (PRO) दिलेले प्रमाणपत्र |
| धार्मिक अल्पसंख्याक | प्रतिज्ञापत्र E: धार्मिक अल्पसंख्याक असल्याचे नोटरीकृत शपथपत्र |
| प्रकल्पग्रस्त व्यक्ती (महाराष्ट्र) | प्रकल्पग्रस्त कुटुंब वृक्षाचे (वंशावळ) प्रतिज्ञापत्र, निवाडा प्रत, ७/१२ उतारा किंवा संबंधित विभाग/कार्यालयाकडून जारी करण्यात आलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र |
| माजी सैनिक आणि निमलष्करी दल | ओळखपत्र/सेवेचे कागदपत्र/जिल्हा सैन्य मंडळ किंवा संबंधित प्राधिकरणाकडून जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र |
| माथाडी कामगार | माथाडी बोर्डाचे प्रमाणपत्र (केवळ मुंबई महानगर क्षेत्रासाठी) |

नोंद: सर्व फॉर्म डिजिटल स्वरूपात भरावे लागतील आणि केलेल्या घोषणांच्या समर्थनार्थ आवश्यक ती प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. सर्व दस्ताऐवजांची स्वसाक्षांकीत स्कॅन केलेली प्रत jpg / png / pdf या स्वरूपात असावी. प्रत्येक दस्ताऐवजाचा आकार २ एमबी पेक्षा जास्त नसावा. रहिवासी प्रमाणपत्रासाठी बारकोड असलेला दस्ताऐवज अनिवार्य आहे.

# फॉर्म्स आणि प्रतिज्ञापत्र

## फॉर्म A: आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) अर्जदारांसाठी

मी/आम्ही अर्जदार श्री/श्रीमती______________________________________, वय ______ वर्षे,

सध्या पत्ता__________________________________________________येथे राहात असून,

पॅन क्रमांक ____________________________अंतर्गत आयकर भरणा करते/करतो.

मी/आम्ही प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर मिळवण्यासाठी अर्ज करीत आहे/आहोत. माझ्या कुटुंबातील सदस्यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

| क्र. | सदस्यांची नावे | अर्जदाराशी नाते | लिंग | वय | आधार क्र. आणि पॅन क्रमांक | ओळखपत्र (इतर) | इतर ओळखपत्र क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |

मी/आम्ही पुढील माहिती सादर करतो/करते की, मी/आम्ही आणि माझे/आमचे वरील नमूद कुटुंब सदस्य हे भारतात कुठेही पक्क्या घराचे मालक नाहीत. मी/आम्ही पुढे जाहीर करतो की आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी माझे वार्षिक कुटुंबीय उत्पन्न रु. ६,००,०००/- (रुपये सहा लाख फक्त) पेक्षा कमी आहे.
मी/आम्ही पुढे नमूद करतो की, मी/आम्ही सामान्य / अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / भटक्या जमाती / विमुक्त जमाती / अंध किंवा शारीरिक अपंग व्यक्ती (योग्य असल्याचे नमूद करा) यांमध्ये मोडतो/ मोडते.
मी/आम्ही याही गोष्टीचे प्रमाण देतो/ देते की, मी/आम्ही महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षे राहिलो/ राहिले आहे/आहोत.
मी/आम्ही याही गोष्टीचे प्रमाण देतो की वरील दिलेली माहिती खरी व योग्य आहे.
मी/आम्ही पुढे जाहीर करतो, की वरील माहिती चुकीची आढळल्यास भविष्यात होणाऱ्या कोणत्याही कारवाईसाठी मी/आम्ही जबाबदार असेल/असू आणि सिडकोवर कोणतेही दायित्व ठेवणार नाही.
मी/आम्ही पुढे सांगतो की, वरील दिलेली माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास घराचे वाटप रद्द करण्यास माझे/आमचे काहीही आक्षेप नसतील.
मी जाहीर करतो की, मी सदर योजनेचे नियम समजून घेतले आहेत आणि सिडकोच्या या संदर्भातील सर्व नियम/अटींचे पालन करीन.

अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा

तारीख:

ठिकाण:

**फॉर्म B: अल्प उत्पन्न गट (LIG) अर्जदारांसाठी**

मी/आम्ही अर्जदार श्री/श्रीमती_________________________________________, वय ______ वर्षे, सध्या पत्ता_______________________________________________________येथे राहात असून, पॅन क्रमांक.______________________________अंतर्गत आयकर भरणा करते/करतो.

मी ___________ (संस्थेचे नाव) मध्ये कार्यरत आहे आणि ___________ विभागात काम करतो/करते. आर्थिक वर्ष **२०२४-२५** साठी माझे एकूण वार्षिक कुटुंबीय उत्पन्न ₹ **६,००,००१/-** (रुपये सहा लाख एक फक्त) पेक्षा जास्त आहे.

मी/आम्ही पुढे नमूद करतो की वरील माहिती पूर्णतः खरी आणि योग्य आहे.
मी जाहीर करतो की, मी सर्वसाधारण / अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / भटक्या जमाती / विमुक्त जमाती / अंध किंवा शारीरिक अपंग व्यक्ती (योग्य असल्याचे नमूद करा) या प्रवर्गाअंतर्गत अर्ज करीत आहे.
मी जाहीर करतो की, माझ्याकडे किंवा माझ्या जोडीदाराकडे नवी मुंबईत कुठेही घर नाही. तसेच, मी किंवा माझ्या पती/पत्नी कोणत्याही नवी मुंबईतील सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्य नाही.
मी/आम्ही याही गोष्टीचे प्रमाण देतो की वरील दिलेली माहिती खरी व योग्य आहे.
मी/आम्ही जाहीर करतो की, वरील माहिती चुकीची आढळल्यास भविष्यात होणाऱ्या कोणत्याही कारवाईसाठी मी/आम्ही जबाबदार असेल/असू आणि सिडकोवर कोणतेही दायित्व ठेवणार नाही.
मी/आम्ही जाहीर करतो की, वरील माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास मी/आम्हाला देण्यात येणाऱ्या/वाटप केलेल्या घराच्या रद्दबातल करण्यात काहीही आक्षेप नसतील.
मी जाहीर करतो की, मी सदर योजनेचे नियम समजून घेतले आहेत आणि सिडकोच्या या संदर्भातील सर्व नियम/अटींचे पालन करीन.

अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा

तारीख:

ठिकाण:

## फॉर्म C: महाराष्ट्र राज्य सरकारी अधिकारी / कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र – संबंधित विभागाच्या अधिकृत लेटरहेडवर

हे प्रमाणित करण्यात येते की श्री/श्रीमती ___________________________________________हे/या पत्ता______________________________________________________________________ येथे राहणारे असून, पॅन क्रमांक___________________________________________अंतर्गत आयकर भरणारे आहेत आणि हे/त्या महाराष्ट्र राज्य शासनाच्या या विभागात कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांची नियुक्ती दिनांक__________________रोजी झाली आहे. सध्या ते/त्या___________________________ विभागात__________________या पदावर कार्यरत आहेत.

तारीख:

ठिकाण:

अधिकाऱ्याचे नाव:
पद:
विभाग:

विभागाचा शिक्का:

## फॉर्म D: महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांसाठी

मी/आम्ही अर्जदार श्री/श्रीमती_________________________________________, वय_______ वर्षे,

पत्ता __________________________________________________________ येथे राहणारे असून,

पॅन क्रमांक/आधार कार्ड क्रमांक ____________________________ अंतर्गत आयकर भरणारे आहे/आहेत.

मी परिशिष्ट क्र II नुसार पत्रकार प्रवर्गात समाविष्ट असून, ____________________________ (पदाचे नाव नमूद करा)* या पदावर एका साप्ताहिक/मासिक किंवा नियतकालिकात किंवा वृत्तपत्र संस्थेशी संलग्न आहे.

मी पत्रकार या श्रेणीत समाविष्ट आहे, तसेच, मी वृत्तपत्र व्यवस्थापन व प्रशासकीय विभागातील कर्मचारी किंवा पर्यवेक्षक अथवा व्यवस्थापन प्रकारात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या गटात समाविष्ट नाही.

मी/आम्ही पुढे सांगतो की वरील माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास घराचे वाटप रद्द करण्यास कोणताही आक्षेप राहणार नाही.

अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा

तारीख:

# परिपत्रक II

पत्रकारांना 'पत्रकार प्रमाणपत्र' देण्यासाठी निकष/ नियमावली

१) वृत्तवाहिनी / वृत्तपत्रे / साप्ताहिक / मासिक /नियतकालिके या माध्यमांमध्ये संपादकीय विभागात तसेच मुक्त पत्रकार म्हणून काम करण्याचा किमान सलग तीन वर्षांचा अनुभव. (वरील अटींची पूर्तता करणारे पत्रकार हे स्वतंत्र व्यवसायी किंवा करार पध्दतीने नेमणूक झालेले अथवा श्रमिक पत्रकार असू शकतील.)

२) स्वतःच्या नावे किंवा माझ्या पतीच्या / पत्नीच्या नावे मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रात किंवा संबंधित सोडतीतील सदनिका / भूखंड ज्या महापालिकेच्या कार्यक्षेत्रात येते त्या कार्यक्षेत्रात सदनिका अथवा भूखंड नाही, तसेच यापूर्वी म्हाडा / सिडको / मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार कोट्यातून (१०% / ५%) सदनिका घेतलेली नाही असे पत्रकार.

३) वृत्त वाहिन्यांच्या संपादकीय विभागात कार्यरत व्यक्ती ज्यांचा संबंध पत्रकारितेशी येतो अशा खालील पदांवर संपादकीय विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांचा समावेश 'पत्रकार' म्हणून करण्यात येईल- १ वरिष्ठ कार्यकारी संपादक (Senior Executive Editor), २ कार्यकारी संपादक (Executive Editor), ३ सहाय्यक संपादक (Assistant Editor), ४ वृत्त संपादक (News Editor), ५ सहाय्यक संपादक (Associate Editor), ६ वरिष्ठ निर्माता (Senior Producer), ७ निर्माता (Producer), ८ सहयोगी निर्माता (Associate Producer), ९ सहाय्यक निर्माता (Assistant Producer), १० आशय निर्माता (Content Producer), ११ प्रतिनिधी (Correspondent), १२ बातमीदार / वार्ताहर (Reporter), १३ कॅमेरामन (व्हिडिओ जर्नालिस्ट), १४ वरिष्ठ संपादक (Senior Editor), १५ वृत्तनिवेदक (Anchor) १६ विशेष प्रतिनिधी Correspondent), १७ वंरिष्ठ कॅमेरामन (Senior Cameraman), १८ सहयोगी कॅमेरामन (Associate Cameraman), १९ उपनिर्माता (Deputy Producer), 20 Head Planning & Special Project, 21 Chief Anchor 22 Head News & Programme Production, 23 Associate Executive Producer, 24 Assignment Head, 25 Associate Senior Producer 26 Junior Cameraman, 27 Bureau Chief RC, 28 Head News Gathering, 29 Copy Writer, 30 Stringer, 31 Input Editor 32 Senior Executive Producer33 Senior Reporter 34 Copy Editor 35 Output Editor 36 Deputy Executive Producer 37 Senior Assistant Producer 38 Principal Correspondent 39 Senior Copy Editor 40 Senior Correspondent 41 Senior Sub Editor 42 Channel Head 43 Bulletin Producer cum Anchor 44 Bulletin Producer 45 Associate Bulletin Producer 46 Assistant cameraman

तथापि खालील व्यक्तीचा पत्रकार' या गटामध्ये समावेश होणार नाहीः-

वृत्तवाहिन्यांमध्ये पत्रकारिता, वृत्त संकलन, वृत्त संपादन, वार्तांकन क्षेत्र वगळता व्हिडिओ एडिटर, मेकअप आर्टीस्ट, हेअर स्टायलिस्ट, लायब्ररीयन, सिनीअर लायब्ररीयन, प्लॅनर ऑन स्पेशल प्रोजेक्ट, ग्राफिक डिझायनर, आर्टिस्ट, तांत्रिक पदे.

४) अर्जदाराची पात्रता निश्चित करतेवेळी उत्पन्नाचा स्त्रोत याबाबत स्पष्टता हवी, याकरीता सदनिकेकरिता पत्रकार' संवर्गातून अर्ज करणा-या वृत्तवाहिनी / वृत्तपत्रे / साप्ताहिक / मासिके / नियतकालिके या माध्यमांतील पत्रकार अर्जदाराचे 'पत्रकार' म्हणून काम करताना पूर्णवेळ उपजिविकेचे साधन हे पत्रकारिता असणे बंधनकारक असेल. दूरचित्रवाणी / वृत्तवाहिन्या केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण विभागात नोंदणी झालेल्या आणि २४ तास वृत्त प्रसारण करणाऱ्या असाव्यात.

५) तसेच यापूर्वी म्हाडाने पत्रकार प्रवर्गामध्ये कुणाचा समावेश होतो याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम, 1981 मधील नियम (जी) मध्ये नमूद पूर्वीच्या खालील नमूद बाबींचाही (अर्जदार व्यक्ती वर्तमानपत्राच्या आस्थापनेवरील अथवा वर्तमानपत्राशी संबंधित असावी. संपादक, लिडर रायटर, वृत्त संपादक, वृत्त लेखक, वार्ताहर, व्यंगचित्रकार, वृत्त छायाचित्रकार, मुद्रीत तपासणीस यांचा तसेच जी व्यक्ती नियमित प्रख्यात साप्ताहिक, मासिक वा नियतकालिकांमधील मुक्त पत्रकार) या गटामध्ये समावेश होतो.

तथापि खालील व्यक्तींचा पत्रकार या गटामध्ये समावेश होत नाहीः-

अ) वृत्तपत्र व्यवस्थापन व प्रशासन विभागातील कर्मचारी,

ब) पर्यवेक्षक म्हणून काम करणारे कर्मचारी ज्यांची सेवा वृत्तपत्र कार्यालयाशी संबंधित अथवा ज्या कारणासाठी व्यवस्थापन स्वरूपाचे काम करणारे कर्मचारी, वृत्तपत्रातील पानांची मांडणी, रचना करणारे पेजिनेटर, डीटीपी ऑपरेटर, लेखा विभाग (Account Department) व मनुष्यबळ विकास विभाग / कार्मिक विभाग (Human Resource Department) मुद्रण विभाग (Printing Department) यात कार्यरत कर्मचारी.

६) वृत्तवाहिनी / वृत्तपत्रे / साप्ताहिक / मासिके / नियतकालिक या माध्यमांच्या संबंधित संपादकांनी संबंधित विजेता अर्जदार हा त्या संस्थेच्या संपादकीय विभागात कार्यरत असल्याचा स्पष्ट उल्लेख असलेले व अनुभवाचे पत्र संबंधित संस्थेच्या मूळ लेटरहेडवर आपल्या स्वाक्षरीसह देणे आवश्यक आहे.

७) वृत्तपत्रे / साप्ताहिके / मासिके / नियतकालिक ही माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडे नोंदणीकृतच असणे आवश्यक आहे. वृत्तवाहिनी केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण विभागात नोंदणी झालेल्या व २४ तास वृत्त प्रसारण करणारी असावी.

८) वृत्तपत्रे / साप्ताहिके / मासिके / नियतकालिक यामध्ये काम करणाऱ्या बातमीदार / वार्ताहर / प्रतिनिधीने सोडतीत विजेता ठरल्यानंतर गेल्या ६ महिन्यातील श्रेयनामावलीची किमान ५ कात्रणे (By line clippings) मूळ प्रत सादर करणे आवश्यक आहे.

## फॉर्म E: धार्मिक अल्पसंख्याक श्रेणीतील अर्जदारांसाठी

मी/आम्ही अर्जदार श्री/श्रीमती__________________________________________, वय ______ वर्षे,

पत्ता_____________________________________________________________येथे राहात असून,

पॅन क्रमांक.______________________________अंतर्गत आयकर भरणा करते/करतो.

मी धार्मिक अल्पसंख्याक श्रेणीअंतर्गत अर्ज केला आहे, आणि मी मुस्लिम/सिख/ख्रिश्चन/बौद्ध/पारशी/जैन या धार्मिक अल्पसंख्याक म्हणून केंद्र सरकारच्या नॅशनल कमिशन फॉर माइनॉरिटीज ॲक्ट १९९२ च्या गॅझेट भाग २(c) मध्ये अधिसूचित श्रेणीत येतो/येते.

मी/आम्ही पुढे सांगतो की वरील माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास घराचे वाटप रद्द करण्यास कोणताही आक्षेप राहणार नाही.

अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा

तारीख:

जोडपत्र: शाळा सोडल्याचा दाखला

## फॉर्म F: अविवाहित / एकल अर्जदारांसाठी

मी/आम्ही अर्जदार श्री/श्रीमती ____________________________________________,वय_______वर्षे,

पत्ता__________________________________________________अंतर्गत आयकर भरणारे आहे/आहेत.

पॅन क्रमांक ___________________________ अंतर्गत आयकर भरणारे आहे/आहेत.

सत्य प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की मी अविवाहित आहे. मी प्रधानमंत्री अवास योजने अंतर्गत अर्ज भरुन दिला आहे. तरी मला प्रधानमंत्री अवास योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ देण्यास यावा ही विनंती.

कृपया तुम्ही ज्या गटात अर्ज करु इच्छिता त्या पुढे ✓ अशी खुण कराः

- ☐ मी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) गटातून घरासाठी लाभासाठी अर्ज केला आहे.
- ☐ मी अल्प उत्पन्न गटा अंतर्गत अर्ज केला आहे.

मी येथे जाहीर करतो/करते की, माझ्या कडून दिलेली माहिती माझ्या ज्ञान व समजुतीनुसार खरी व अचूक आहे. दिलेली माहिती खोटी आढळल्यास, त्यासंबंधी कोणतीही कायदेशीर कारवाई होण्याची जबाबदारी फक्त माझ्यावर राहील. मी ही माहिती कोणत्याही बळजबरीशिवाय स्वेच्छेने दिली आहे आणि तिची अचूकता मी प्रामाणिकपणे मान्य करतो/मान्य करते. माहिती खोटी आढळल्यास, भारतीय दंड संहिता (IPC) चे कलम १९९, २०० आणि १९३ (२) किंवा संबंधित कलमे भारतीय न्याय संहिता (BNS) चे (कलम २२७, २३४ आणि २३५) लागू होतील.

हा शपथपत्राचा मजकूर माझ्या मातृभाषेत मला वाचून दाखवण्यात आला असून, मी हे सत्य व अचूक असल्याची पुष्टी करतो/करते.

अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा                                        तारीख:

## फॉर्म G: स्वयंघोषणापत्र

(अर्जदार जो कोणत्याही नोकरीत/व्यवसायात रुजू नाही/काम करत नाही)

मी श्री./ सौ. ________________________________________,व्यवसाय_______अर्ज,

क्रमांक__________________________क्रमांक__________________________आहे/आहेत.

_________________ वय ____ वर्षे, सदर प्रतिज्ञापत्र असे शपथपूर्वक सांगतो / सांगते की,

मी स्वतः सध्या कोठेही नोकरी करत नाही किंवा कोणताही व्यवसाय करत नाही. त्यामुळे त्यांचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न निरंक आहे.

मी यापुढे असे जाहीर करतो की/ करते की, माझ्या परिवारात खालील सदस्य आहेत.

| अ. क्र. | नाव | नाते | व्यवसाय / नोकरीचे उत्पन्न |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |

वर नमूद केलेली माहिती खरी व बरोबर आहे.

मी यापुढे असे कथन करतो/करते की, वर दिलेली माहिती भविष्यात जर चुकीची आढळल्यास होणाऱ्या कारवाईस मी जबाबदार राहिल व सिडको महामंडळास त्याकरिता कोणत्याही प्रकारची तोषीस लागू देणार नाही. त्याचप्रकारे वाटप करण्यात आलेले घर रद्द करण्याबाबत माझी कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही.

सत्यप्रतिज्ञेवर आज दिनांक ______________________ रोजी नवी मुंबई येथे जाहीर केले आहे.

स्वाक्षरी: तारीख:

अर्जदाराचे नाव:

## फॉर्म G: स्वयंघोषणापत्र

(अर्जदाराची पती/ पत्नी नोकरी करीत नसल्यास)

मी श्री./ सौ. ________________________________________,व्यवसाय__________अर्ज,

क्रमांक__________________________राहणार________________________________

_________________वय____वर्षे, सदर प्रतिज्ञापत्र असे शपथपूर्वक सांगतो / सांगते की,

माझे / माझ्या पत्नी / पती श्री./ सौ. __________________________________वय__________ सध्या कोठेही नोकरी करीत नाही किंवा कोणताही व्यवसाय करीत नाही. त्यामुळं त्यांचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न निरंक आहे.

मी यापुढे असे जाहीर करतो / करते की, माझ्या परिवारात खालील सदस्य आहेत.

| अ. क्र. | नाव | नाते | व्यवसाय / नोकरीचे उत्पन्न |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |

मी यापुढे असे कथन करतो/करते की, वर दिलेली माहिती भविष्यात जर चुकीची आढळल्यास होणाऱ्या कारवाईस मी जबाबदार राहिल व सिडको महामंडळास त्याकरिता कोणत्याही प्रकारची तोषीस लागू देणार नाही. त्याचप्रकारे वाटप करण्यात आलेले घर रद्द करण्याबाबत माझी कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही.

सत्यप्रतिज्ञेवर आज दिनांक ______________________ रोजी नवी मुंबई येथे जाहीर केले आहे.

स्वाक्षरी: तारीख:

अर्जदाराचे नाव:





सिडको
शहरांचे शिल्पकार

९१ ९९३०८ ७०००० | भेट द्या https://cidcohomes.com

अस्वीकरण: येथे दर्शविण्यात आलेल्या/ नमूद केलेल्या सोयी सुविधा, तपशील, पायाभूत सुविधा, छायाचित्रे प्रतिनिधिक आहेत. प्रकल्पाच्या ठिकाणाची, तेथील घरांची / सदनिकांची कल्पना यावी, यासाठी त्यांचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामुळे येथे नमूद केलेल्या गोष्टी आणि वास्तविक परिस्थिती यात बदल असू शकतो, आजूबाजूचा परिसर, अंतर्गत रचना, रंगसंगती, इत्यादी गोष्टींचा केवळ संदर्भ म्हणून उपयोग करण्यात आला आहे. प्रत्यक्षात त्या वेगळ्या असू शकतात किंवा त्यात बदलही झालेला असू शकतो.